खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०६ | अंक : २३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.०६ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## खापरखेड्यात युवकांवरील जीवघेण्या हल्ला प्रकरणात मकोकाची कारवाई

**अक्षराज : दिवाकर घेर**




**दि.०५, नागपूर :** खापरखेडा येथील नाग मंदिर चौक परिसरात युवकांवर झालेल्या जीवघेण्या हल्ला प्रकरणात पोलिसांनी कठोर पाऊल उचलत आरोपींविरुद्ध महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम, १९९९ (MCOCA) अंतर्गत कारवाई केली आहे. तपासादरम्यान समोर आलेली आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि संघटित स्वरूपातील गुन्हेगारी कारवायांमधील सहभाग लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रज्वल प्रदीप जाने (वय १८, रा. खापरखेडा) हा २१ ऑगस्ट २०२६ रोजी त्याचे मित्र हिमांशू कडू, रक्षित कापसे, पुनीत भगत, रोहित मिश्रा व सिद्धांत सातनकर यांच्यासोबत नाग मंदिर चौक परिसरात चहा पीत बसला होता. त्यावेळी सूरज कावले, संघर्ष बागडे, साहिल बागडे, शुभम मोहिते, सुदाम उर्फ चाफाडाहाके व त्यांच्यासोबतचे इतर इसम मोटारसायकल आणि अन्य वाहनांनी तेथे आले.

आरोपीनुसार, सूरज कावले याने धारदार शस्त्राने हिमांशू कडू व रोहित मिश्रा यांच्यावर वार करून त्यांना गंभीर जखमी केले, तर इतरांनी फिर्यादी व त्याच्या मित्रांना दांड्याने आणि लाथाबुक्यांनी मारहाण केली. या हल्ल्यात युवकांना ठार मारण्याचा प्रयत्न झाल्याच्या तक्रारीवरून खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**९ आरोपींना अटक; ४ फरार**

तपासादरम्यान मोहन रोशनसिंग खुरावत, युगांत राजेश सारवे, प्रियांशू विद्याधर रक्षित, हेमंत उर्फ सुदामा मधुकर चाफाडाहाके, जितू रामचंद्र कनोजिया, शांतनु उर्फ दद्दू उर्फ राजेंद्र बागडे, शेख समीर उर्फ बोमट्या, चेतन सतीशराव पाटमासे आणि हर्ष उर्फ आकाश राजेश वर्मा या ९ आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणात ३ विधीसंघर्ष बालकांवरही कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, सूरज कावले, संघर्ष बागडे, साहिल बागडे व शुभम उईके हे अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.

**गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या आधारे मकोकाची कारवाई**

तपासादरम्यान आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी, संघटित स्वरूपातील कारवायांमधील सहभाग आणि इतर महत्त्वपूर्ण बाबींचे परीक्षण करण्यात आले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मंजुरीने आरोपींविरुद्ध MCOCAच्या संबंधित तरतुदींनुसार कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलीस आयुक्त, नागपूर शहर, सहपोलीस आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक ६ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, कामठी विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली खापरखेडा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांनी केली.

## मोफत अंतराळ प्रशिक्षण देणारा ठाणे देशातील पहिला जिल्हा!

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०५, ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील शाळकरी विद्यार्थ्यांनी अवकाश विज्ञान आणि अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कामगिरी करत देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. अंतराळ संशोधनात झेप घेणारे बदलापूरचे सोहम साळवे आणि डोंबिवलीची अदिती प्रवीण ठक्कर या दोन्ही बालवैज्ञानिकांची ठाणे जिल्ह्याचे ‘स्पेसक्रॅट ॲम्बेसेडर’ म्हणून निवड झाली असून, या यशाबद्दल ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी या दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

पुणे येथील 'स्पेसक्रॅट्स विद्यापीठ' संस्थेच्या वतीने संपूर्ण देशभरातील १ लाख विद्यार्थ्यांमधून टप्प्याटप्प्याने निवड चाचणी घेण्यात आली होती. त्यापैकी १० हजार विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या आणि अंतिम फेरीत देशभरातून १ हजार विद्यार्थ्यांची निवड झाली. या खडतर प्रक्रियेतून ठाणे जिल्ह्यातील सोहम साळवे या विद्यार्थ्याने स्थान मिळवत ज्युनिअर सायंटिस्टचे विशेष प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले. या दैदिप्यमान कामगिरीबद्दल सोहमला नुकताच प्रतिष्ठित 'बदलापूर रत्न' पुरस्कार जाहीर झाला आहे. बदलापूर येथील पोद्दार इंटरनॅशनल स्कूलमध्ये शिकणाऱ्या सोहमने वयाच्या अवघ्या नवव्या-दहाव्या वर्षापासून इस्रो-मॅजिका आणि स्पेसक्रॅटच्या माध्यमातून हे प्रशिक्षण सुरू केले होते. मागच्या तीन वर्षांच्या काळात त्याने अंतराळ आणि ब्रह्मांड या विषयावर तब्बल तीन पुस्तके लिहिली असून, तो सध्या 'इंटरनॅशनल सायंटिस्ट प्रोग्राम'च्या दुसऱ्या वर्षात संशोधन करत आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय ॲस्ट्रॉनॉमी आणि ॲस्ट्रोफिजिक्स स्पर्धेत त्याने सलग दोन वर्षे सहभाग नोंदवून गतवर्षी 'सिल्व्हर ऑनर' तर यावर्षी 'ब्राँझ ऑनर' पटकावले आहे. सोहमने एका लघुग्रहाचेही यशस्वी संशोधन केले आहे.

त्याचप्रमाणे डोंबिवली येथील के. व्ही. पेंढारकर महाविद्यालयात इयत्ता ११ वी मध्ये शिक्षण घेणारी अदिती प्रवीण ठक्कर हिनेही अविरत मेहनत घेत अंतराळ विज्ञानात मोठे यश संपादन केले आहे. आठवीत असल्यापासून अवकाश संशोधनाचा ध्यास घेतलेल्या अदितीने ब्रह्मांडात तब्बल १६ लघुग्रहांचा शोध लावला आहे. तिच्या या संशोधनाची थेट अमेरिकेच्या 'नासा' या जागतिक अंतराळ संशोधन संस्थेने अधिकृत दखल घेत आपल्या संकेतस्थळावर माहिती प्रसिद्ध केली आहे.

या दोन्ही बालवैज्ञानिकांचे शिक्षक डॉ. युवराज लांबोळे आणि स्पेस सायंटिस्ट प्रवीण वाकोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्पेसक्रॅट्स विद्यापीठाने इस्रो, नासा अशा नामांकित जागतिक संस्थांशी संलग्नता ठेवली आहे. त्यांच्याकडे ॲनालॉग ॲस्ट्रॉनॉट, रॉकेट सायंटिस्ट आणि तरुण संशोधकांसह ३७ तज्ज्ञांची भक्कम टीम कार्यरत आहे. देशाचे पंतप्रधान आणि इस्रोचे स्वप्न असलेल्या 'हर घर से सायंटिस्ट' या संकल्पनेला मूर्त रूप देण्यासाठी या टीमने पुढाकार घेतला आहे. ठाणे जिल्ह्यातील सर्व शाळा आणि महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांपर्यंत विनामूल्य स्पेस रिसर्चचे प्रशिक्षण पोहोचवण्यासाठी या दोन्ही ज्युनिअर सायंटिस्टची ठाणे जिल्ह्याचे 'स्पेसक्रॅट ॲम्बेसेडर' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## आशिया कपमध्ये भारताच्या वाघिणींनी फोडली विजयाची हंडी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** आशिया कप २०२६ मधील ग्रुप स्टेजमधील ९ व्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा ७ विकेटने पराभव करत विजयाची हंडी फोडली. भारताच्या वाघिणींनी या विजयासह स्पर्धतील आपला सलग तिसरा विजय नोंदवला. आशिया कपमध्ये भारताने सातव्यांदा पराभूत केले. टॉस जिंकत पहिल्यांदा बॅटिंग करणाऱ्या पाकिस्तान संघाला ५५ धावांवर ऑल आऊट केले होते. भारताच्या फिरकीसमोर पाकिस्तानच्या फलंदाजांनी गुडघे टेकवले. या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारताची सुरूवातही खराब झाली होती. पण दीप्ती शर्मा आणि हरमनप्रीत कौर यांनी सामना जिंकवला.




**पाकिस्तान ५५वर ऑल आऊट**

या सामन्यात पाकिस्तान संघाची कर्णधार फातिमा सना हिने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र भारतीय गोलंदाजांसमोर पाकिस्तानची फलंदाजी ढेपाळली, अवघ्या ५५ धावांवरच भारतीय गोलदाजांना त्यांना गुंडाळले. पाकिस्तान संघाने त्यांच्या इतिहासातील सर्वात कमी धावसंख्या ठरली, याआधी ५६ होती मात्र आता ५५ धावांवरच त्यांचा डाव आटोपला. पाकिस्तानची सुरूवात चांगली झाली होती, कारण चार ओव्हरपर्यंत पाकिस्तानची धावसंख्या २२-० होती परंतु पाचव्या ओव्हरपासून पाकिस्तानला झटके बसायला सुरूवात झाली त्यानंतर त्यांना सावरता आली नाही. पाकिस्तानकडूनसलामीवीर मुनीबा अली १३ धावा आणि शवाल जुल्फिकारच्या १४ धावा सोडल्या तर त्यानंतर कोणालाही दुहेरी आकडा गाठता आला नाही. कर्णधार फातिमा सनासुद्धा भोपळा फोडू शकला नाही. भारताकडून श्री चरणी आणि प्रेमा रावल यांनी प्रत्येकी ३-३ विकेट घेत पाकिस्तान संघाला बॅकफूटवर ढकलले. त्यासोबतच दीप्ती शर्माने २ आणि शेफालीने १ विकेट नावावर केली.

**भारताने साकारला विजय !**

पाकिस्तानच्या छोट्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या भारतीय संघाची सुरूवात खराब झाली. पाकिस्तानची कर्णधार फातिमाने तीन झटके देत सामन रंगतदार करण्याचा प्रयत्न केला होता. शेफाली वर्मा १२ धावा, स्मृती मानधना ९ धावा आणि प्रतिका रावल हिला ४ धावांवर आऊट केले होते. त्यानंतर मैदानात कर्णधार हरमनप्रीत कौर आणि अनुभवी दीप्ती शर्मा यांनी विकेटवर थांबून राहत नाबाद २८ धावांची भागीदारी केली आणि विजय खेचून आणला. कर्णधार म्हणून १५०वा सामना खेळणाऱ्या हरमनप्रीतने कडक षटकार मारत विजय साकारला. हरमनप्रीतने नाबाद १८ आणि दीप्तीने नाबाद १४ धावा केल्या. दरम्यान, या विजयासह भारताने ग्रुप स्टेजमधील तिन्ही सामने जिंकले. या तीन विजयांसह भारताचे सहा गुण झाले असून भारताने दुसरा सामना जिंकल्यावरच सेमी फायनलमध्ये आपले स्थान पक्के केले होते. आत तिसऱ्या विजयासह भारतीय संघ अजिंक्य राहिला आहे.

**भारतीय महिला संघ**

**(प्लेइंग ११) :** स्मृती मानधना, शेफाली वर्मा, प्रतिका रावल, हरमनप्रीत कौर (C), भारती फुलमाली, रिचा घोष (WK), दीप्ती शर्मा, प्रेमा रावत, नंदनी शर्मा, श्री चरणी, क्रांती गौड

**पाकिस्तान महिला संघ**

**(प्लेइंग ११) :** मुनीबा अली (WK), शवाल जुल्फिकार, गुल फिरोजा, आयेशा जफर, सदफ शमास, फातिमा सना (C), उम्म-ए-हानी, आयमान फातिमा, तुबा हसन, नशरा संधू, सादिया इक्बाल

## खापरखेड्यात दहशत माजविणाऱ्या टोळीवर पोलिसांचा बडगा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** खापरखेडा परिसरात मारामारी करून दहशतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या टोळीवर खापरखेडा पोलिसांनी मोठी प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन टोळीतील पाच जणांना दोन वर्षांच्या कालावधीसाठी तडीपार करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजताच्या सुमारास मिलन चौक-चणकापूर परिसरातून आकाश सोमर हे आपल्या मित्रांसह मोटारसायकलीने वारेगाव रोडकडे जात होते. यावेळी राज बाबा बारसमोर आरोपींनी त्यांच्याशी वाद घालून मारहाण केल्याचा आरोप आहे. फिर्यादी व त्यांच्या मित्रांना शिवीगाळ करून धमकावण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.




या प्रकरणी खापरखेडा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ४८९/२०२६ नोंदविण्यात आला असून, भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांन्वये आरोपींविरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

या प्रकरणातील टोळी प्रमुख अक्षय उर्फ डगम पुरुषोत्तम भोसकर (२७) याच्यासह सुमित शेषराव वंजाळ (२८), अनिकेत संध्यसेवक वासनिक (१८), सुनील रामदास वाघधरे (४२) आणि पियुष हिरामण पाल (२०) या पाच जणांविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत दोन वर्षांसाठी तडीपारीची कारवाई करण्यात आली.

संबंधित आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी, त्यांच्याविरुद्ध दाखल असलेले गुन्हे तसेच त्यांच्या हालचालींमुळे भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता विचारात घेऊन ही कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या कारवाईचा उद्देश आरोपींच्या गुन्हेगारी हालचालींना आळा घालणे आणि परिसरातील नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करणे हा आहे.

ही कारवाई नागपूर शहर पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रादेशिक विभाग), पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक ६ तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त, कामठी विभाग यांच्या सूचनेनुसार खापरखेडा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## भाजप हा लोकहितासाठी काम करणारा पक्ष : आ. देवराव भोंगळे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** आगामी विविध निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजुरा विधानसभा मतदारसंघात राजकीय घडामोडींना वेग आला असून, लखमापूर येथील शेतकरी संघटनेचे नेते मोरेश्वर आस्वले तसेच निमणी येथील सरपंच अतुल धोटे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. या पक्ष प्रवेशामुळे शेतकरी संघटनेला मोठा धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. लखमापूर येथे आयोजित भव्य पक्षप्रवेश कार्यक्रमात राजुरा विधानसभा मतदारसंघाचे आ. देवराव (दादा) भोंगळे यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे भाजपचे दुपट्टे घालून स्वागत करण्यात आले.

यावेळी बोलताना आ.भोंगळे म्हणाले, भारतीय जनता पक्ष हा केवळ राजकीय सत्ता मिळविणारा पक्ष नसून तळागाळातील सामान्य नागरिक, शेतकरी, कष्टकरी आणि तरुणांच्या न्याय्य हक्कांसाठी अविरत कार्य करणारा पक्ष आहे. पक्षाची धोरणे सर्वसमावेशक विकासाला गती देणारी असून, लोकहिताचे कार्य करणारा प्रमुख पक्ष म्हणून भाजपा काम करीत आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली विकासकामांना गती मिळत असल्याचे



सांगत आ.भोंगळे यांनी ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हे भाजपचे प्रमुख ध्येय असल्याचे नमूद केले. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ समाजातील शेवटच्या घटका पर्यंत पोहोचविण्यासाठी भाजपा प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी सांगितले.

भाजपमध्ये प्रवेश केलेल्या नवप्रवेशित कार्यकर्त्यांनी आ. देवराव भोंगळे यांच्या नेतृत्वाखाली राजुरा विधानसभा मतदार संघात सुरू असलेल्या विकास कामांमुळे आणि त्यांच्या कार्यशैलीने प्रभावित होऊन भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

या पक्षप्रवेश कार्यक्रमाला भाजपचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे, कोरपना तालुकाध्यक्ष संजय मुसळे, तालुका संघटन महामंत्री सतीश उपलेंचवार, गडचांदूर शहराध्यक्ष अरविंद डोहे, पालगावचे सरपंच अरुण रागीट, राजुरा तालुकाध्यक्ष वामन तुराणकर, जिल्हा कार्यकारिणी सदस्य विशाल गजलवार, आदिवासी आघाडी जिल्हाध्यक्ष अरुण मडावी, भाजयुमो तालुकाध्यक्ष दिनेश खडसे, प्रफुल कावळे, नगरसेवक सतीश बेतावार, हिमांशु नामवाड, नगरसेविका संगीता गावत्रे, कीर्ती वैरागडे, नम्रता डुकरे, कवठाळाच्या सरपंचा रुपाली बोबडे, नंदा पाटेकर, अशोक झाडे, नांदा भाजप शहराध्यक्ष संजय नीत, रवी बंडीवार, प्रमोद कोडापे, श्रीकृष्ण गोरे, विशाल पावडे, नरसिंग हामने, संजय थिपे, ज्ञानेश्वर पानघाटे, आबाजी बोबडे, अविनाश वाभिटकर, सचिन बोंडे, राजू डाखरे, पुरुषोत्तम निब्रड, समशेर शेख, प्रदीप पारखी, निलेश भिवापुरे, अनिल संकुलवार, सुरेश चौधरी, शंकर उरकुडे, दिलीप काकडे, रविंद्र वडस्कर, सुरेश बुऱ्हाण,शंकर शेंडे, रवींद्र नांदे, मारोती पांढरे, नामदेव येडमे, भाऊराव जुमनाके यांच्यासह इतर भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दरम्यान, मोरेश्वर आस्वले, अतुल धोटे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांच्या भाजप प्रवेशामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांसह विविध निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कोरपना तालुक्यातील राजकीय समीकरणांवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## संपादकीय

### डीजे हटवावा; मात्र गणेशोत्सवाचा उत्साह नव्हे

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. विघ्नहर्त्या गणरायाचे आगमन म्हणजे भक्ती, आनंद, उत्साह आणि सामाजिक एकोप्याचा सोहळा. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधन, सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा संदेश देण्याची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. मात्र कालांतराने या उत्सवात मोठ्या प्रमाणावर ध्वनिप्रदूषण, अवाजवी खर्च आणि दिखाव्याची स्पर्धा वाढताना दिसत आहे. विशेषतः डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

गणेशोत्सवातील मिरवणुका, मंडप आणि विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या आवाजात डीजे वाजवण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. आवाजाची तीव्रता इतकी मोठी असते की परिसरातील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण तसेच रात्रपाळी करून विश्रांती घेणाऱ्या नागरिकांच्या शांततेवर त्याचा परिणाम होतो. केवळ माणसांनाच नव्हे, तर पक्षी आणि प्राण्यांनाही मोठ्या आवाजाचा त्रास होतो. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आनंदात इतरांच्या आरोग्याचा आणि शांततेचा बळी देणे योग्य ठरणार नाही.

पुण्यात सुरू झालेल्या 'डीजे हटाव' चळवळीला मिळणारा प्रतिसाद ही वाढत्या जनजागृतीची चिन्हे आहेत. या चळवळीचे पडसाद महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये आणि गावांमध्ये उमटताना दिसत आहेत. मात्र प्रश्न असा आहे की, डीजेवर पूर्णपणे बंदी घालणे हा उपाय आहे की आवाजाला मर्यादा घालणे हा अधिक योग्य मार्ग आहे? यावर समाजाने आणि प्रशासनाने शांतपणे विचार करणे आवश्यक आहे.

गणेशोत्सवातील पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, भजन, कीर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांना आपली वेगळी ओळख आहे. आधुनिक मनोरंजनाच्या नावाखाली पारंपरिक संस्कृती बाजूला पडणे योग्य नाही. उत्सवातील आनंद टिकवून ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाला आळा घालणे शक्य आहे. त्यासाठी ध्वनीची मर्यादा, वेळेचे काटेकोर पालन आणि नियमांचे प्रभावी पालन आवश्यक आहे.

यासाठी प्रशासनाने केवळ गणेशोत्सवाच्या काळात कारवाई न करता वर्षभर जनजागृती केली पाहिजे. गणेश मंडळांनीही सामाजिक जबाबदारी स्वीकारून ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सव साजरा करण्याचा संकल्प केला पाहिजे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणताही भेदभाव न करता कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर नागरिकांनीही तक्रार करण्यापेक्षा प्रथम स्वतः जबाबदार नागरिक म्हणून नियमांचे पालन करण्यास सुरुवात केली पाहिजे.

गणेशोत्सव हा आवाजाची ताकद दाखवण्याचा नव्हे, तर भक्तीची ताकद दाखवण्याचा उत्सव आहे. डीजेचा दणदणाट जितका मोठा, तितकी भक्ती मोठी असे समीकरण असू शकत नाही. उलट शांतता, शिस्त, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी यामुळे उत्सवाचे खरे सौंदर्य खुलते.

डीजेचा दणदणाट थांबवणे म्हणजे गणेशोत्सवाचा उत्साह कमी करणे नव्हे. उलट ध्वनिप्रदूषणाला आळा घालून भक्ती, संस्कृती आणि सामाजिक सलोखा जपणे होय. 'उत्सव हवा, पण त्रास नको' हा विचार प्रत्येक गणेश मंडळाने आणि प्रत्येक नागरिकाने स्वीकारला, तर गणेशोत्सव खऱ्या अर्थाने आनंदोत्सव ठरेल.

**– श्याम ठाणेदार**

# हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात रंग भरणारे प्रेरणादायी कलाशिक्षक श्रीराम महाजन

**कलेची साधना, ज्ञानदानाची तळमळ आणि समाजसेवेचा वसा जपत हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात रंग भरणारे प्रेरणादायी कलाशिक्षक,**

**श्रीराम महाजन....**





मातीच्या कुशीतून उमललेले एखादे नाजूक रोप प्रतिकूल परिस्थितीवर मात करत वटवृक्षाचे रूप धारण करते, त्याप्रमाणे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आपल्या कर्तृत्वाचा, जिद्दीचा आणि अथक परिश्रमाचा प्रवास घडवत स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणारे कलाशिक्षक म्हणजे श्रीराम साहेबराव महाजन सर

१ मे १९८२ रोजी जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यातील पिपळवाड म्हाळसा गावात ऊसतोड कामगार कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडील कै.साहेबराव रामचंद्र महाजन आणि आई श्रीमती. द्वारकाबाई महाजन यांच्या कष्टमय जीवनसंघर्षाची सावली बालपणापासूनच त्यांच्या वाट्याला आली. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असतानाही श्रीराम सरांनी परिस्थितीला कधीही शरणागती पत्करली नाही. उलट, परिस्थिती माणसाला घडवते; पण जिद्दीचा माणूस परिस्थिती घडवतो', या उक्तीचा प्रत्यय त्यांच्या जीवनप्रवासातून येतो.

त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आजोळी झाले. शालेय जीवनापासूनच अभ्यासाबरोबरच चित्रकलेची विलक्षण आवड त्यांना निर्माण झाली. त्यांच्या कुंचल्यातून उमटणाऱ्या रेषांना हळूहळू आकार, रंग आणि अर्थ प्राप्त होत गेला. विविध चित्रकला स्पर्धांमध्ये सहभाग घेत त्यांनी पारितोषिकांची मालिकाच सुरू केली. चित्रकार होण्याचे स्वप्न त्यांनी मनाशी बाळगले आणि ते स्वप्न साकारण्यासाठी जागेपणीच त्याचा पाठलाग सुरू केला.

सराव, जिद्द आणि मेहनत यांची त्रिवेणी त्यांच्या आयुष्याला नवी दिशा देत गेली. आर्थिक अडचणी असतानाही त्यांनी आपले कलाशिक्षण थांबवले नाही. माध्यमिक शिक्षण पूर्ण करतानाच त्यांनी एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षा उत्तीर्ण केल्या.

कलेच्या ज्ञानाची ओढ त्यांना पुढे घेऊन गेली. १९९९ मध्ये फाउंडेशन अभ्यासक्रम, २००० मध्ये कलाशिक्षक पदवी आणि २००१ मध्ये हस्तकला शिक्षणाचा अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांनी कलाक्षेत्रातील आपली शैक्षणिक वाटचाल अधिक भक्कम केली. पुढे २००९ मध्ये आर्ट मास्टर व जी. डी आर्ट अभ्यासक्रम पूर्ण करून त्यांनी आपल्या ज्ञानात आणखी भर घातली.

मुंबईसारख्या मायानगरीत पाऊल ठेवताना त्यांच्या डोळ्यांत स्वप्न होते; मात्र त्या स्वप्नांना आकार देण्यासाठी संघर्षाची वाटचालही होती. अंधेरी येथील ॲनिमेशन स्टुडिओमध्ये मिळालेली चांगल्या पगाराची नोकरी न स्वीकारता त्यांनी शिक्षण आणि कला यांना आपल्या जीवनाचे ध्येय मानले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देण्याचे समाधान नोकरीच्या आकर्षणापेक्षा मोठे आहे, या भावनेतून त्यांनी कलाशिक्षक म्हणून कार्य करण्याचा निर्णय घेतला.

२००१ साली श्रीराम विद्यालय, ऐरोली, नवी मुंबई येथे कलाशिक्षक म्हणून कार्यरत झाले. पुढे २०११ साली चेंबूर कर्नाटका हायस्कूलमध्ये रुजू झाल्यानंतर त्यांच्या कलासेवेच्या नव्या पर्वाला सुरुवात झाली. आजवर असंख्य विद्यार्थ्यांना त्यांनी चित्रकला, हस्तकला आणि सर्जनशील कलेचे मार्गदर्शन केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनातून घडलेले विद्यार्थी केवळ शालेय स्तरावरच नव्हे, तर राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही आपल्या कलेचा ठसा उमटवत आहेत.

श्रीराम महाजन सरांची ओळख केवळ चित्रकलेचे शिक्षक म्हणून मर्यादित नाही. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, आत्मविश्वास आणि कलागुण विकसित करण्यासाठी ते सातत्याने विविध उपक्रम राबवतात. चित्रकला, रंगभरण, स्केचिंग, हस्तकला, मातीकाम, गणेशमूर्ती निर्मिती, सुलेखन, कागदकाम, अम्ब्रेला पेंटिंग. विविध रांगोळी,विविध कलाविषयक कार्यशाळा अशा अनेक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना नवी दिशा दिली आहे.

शालेय विद्यार्थ्यांना एलिमेंटरी व इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेसाठी उत्तम मार्गदर्शन करणे ही त्यांची विशेष ओळख आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो विद्यार्थ्यांनी या परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला व्यासपीठ मिळावे म्हणून त्यांनी विविध चित्रप्रदर्शने, चित्रकला स्पर्धा आणि कलाविषयक उपक्रम आयोजित केले. विविध मान्यवरांच्या जयंती व पुण्यतिथीनिमित्त शाळेत भव्य चित्रप्रदर्शने भरवून विद्यार्थ्यांच्या कलाकृतींना प्रसिद्धी मिळवून दिली. अनेक चित्रकला स्पर्धांचे परीक्षक तसेच विविध कलाशिबिरांमध्ये तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणूनही त्यांनी उल्लेखनीय भूमिका बजावली आहे.

कला ही केवळ सौंदर्याची अभिव्यक्ती नसून ती समाजाशी जोडणारी संवेदना आहे, या विचाराने श्रीराम सरांनी आपल्या कलेसोबत समाजसेवेचीही वाट धरली. कोरोनाच्या कठीण काळात गरजू कुटुंबांना धान्य व अन्नधान्याचे वाटप करून त्यांनी सामाजिक बांधिलकी जपली.

आपल्या वडिलांच्या स्मृतीप्रित्यर्थ ₹४५,५५१ किमतीची पुस्तके शाळेच्या ग्रंथालयांना भेट देऊन त्यांनी ज्ञानदानाचा अनोखा आदर्श निर्माण केला. दरवर्षी गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्याचे कार्य ही ते सातत्याने करतात.

'खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे' हा मानवतेचा संदेश आचरणात आणत त्यांनी आपल्या मित्रांच्या सहकार्याने 'कलासाधना सामाजिक संस्था' स्थापन केली. या संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात विविध विधायक उपक्रम राबविले जातात. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंतांचा पुरस्कार देऊन सन्मान करणे, हा संस्थेच्या कार्याचा महत्त्वाचा भाग आहे.

श्रीराम महाजन सरांच्या बहुआयामी कार्याची विविध संस्था व संघटनांनी दखल घेतली आहे. त्यांच्या कलेची, शैक्षणिक कार्याची आणि सामाजिक योगदानाची दखल घेत त्यांना १०० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

तसेच 'बुक ऑफ रेकॉर्ड' मध्ये त्यांच्या कार्याची दोन वेळा नोंद झाल्याने त्यांच्या कलासेवेच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे.

यशाच्या प्रत्येक शिखरामागे कुटुंबाचा मोठा वाटा असतो. श्रीराम महाजन सरांच्या या प्रदीर्घ कलाप्रवासात त्यांच्या पत्नी सौ. मेघा महाजन यांची मोलाची साथ लाभली आहे. नोकरी, कलासेवा आणि समाजसेवा या तिन्ही आघाड्यांवरील जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळताना कुटुंबाने त्यांना दिलेले पाठबळ निश्चितच कौतुकास्पद आहे.

सर, एवढे करून थांबले नाही, तर त्यांनी सुंदर अक्षर ही केवळ लेखनाची कला नसून व्यक्तिमत्त्वाची ओळख आहे, हा विचार अधोरेखित करणारे श्रीराम साहेबराव महाजन लिखित 'माझे अक्षर, माझी ओळख' हे पुस्तक अक्षरसाधनेचा प्रेरणादायी प्रवास घडवते. विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी सुंदर सुलेखन कला अवगत व्हावी. त्यासाठी हे पुस्तक खूप महत्वाचे आहे. सुंदर हस्ताक्षर विकसित करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, तंत्र आणि सरावपद्धती यांचा सुरेख संगम या पुस्तकात आहे. अक्षराला सौंदर्य, शिस्त आणि व्यक्तिमत्त्वाची ओळख देऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी हे पुस्तक मोलाचे मार्गदर्शक आहे.

आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो विद्यार्थी चित्रकलेच्या क्षेत्रात पुढे जात आहेत. एका ऊसतोड कामगाराचा मुलगा ते उत्कृष्ट कलाशिक्षक, कलासाधक आणि संवेदनशील समाजसेवक, हा श्रीराम महाजन सरांचा प्रवास निश्चितच प्रेरणादायी आहे.

जिद्द असेल तर परिस्थिती कितीही प्रतिकूल असो, स्वप्नांना पंख फुटतात आणि कर्तृत्वाला आकाशही अपुरे पडते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे श्रीराम महाजन सर.

कलेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवनात रंग भरणाऱ्या, ज्ञानदानातून भविष्य घडविणाऱ्या आणि समाजसेवेतून माणुसकीचा दीप तेवत ठेवणाऱ्या या कलेच्या अवलियाला त्यांच्या अलौकिक जिद्दीला, अथक मेहनतीला आणि कलासाधनेला मनःपूर्वक सलाम!

**शून्यातूनही विश्व निर्माण करता येते**
**फक्त मनात जिद्द आणि आत्मविश्वास हवा!**

**– शब्दांकन : गजानन भिमराव पाटील**
**(सहा.शिक्षक)**
**चेंबूर कर्नाटका हायस्कूल, चेंबूर मुंबई.**

## स्मारक भग्न

समाजकंटक कुणी
स्मारका करी भग्न
नाचाया थया थया
तत्परअसतात नग्न

शासनचालले छान
आयते आले विघ्न
ढोल ताशे वाजवा
चलरे मोडाया लग्न

कशाला उगा काम
होती सगळे उद्विग्न
डोळे मिटे प्रशासन
आपले मस्तीत मग्न

तपास बसावे करत
कोण कुणा संलग्न
आगीचे बंब येईतो
बेचिराख करी अग्न

अस्मितेला लागेचूड
परंपरे दिला भडाग्न
काळेकृत्य काळिमा
मूळ हेतूला चिताग्न

सत्ता धारी विरोधक
वाद विवादा विमग्न
संरक्षणा ऐशी तैशी
यंत्रणा बनते विनग्न

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# तेव्हा आपली ओळख पूर्णपणे नष्ट झालेली असेल!

आजपासून बरोबर १०० वर्षांनंतर म्हणजे २१२६ मध्ये पृथ्वीवरची आपली ओळख पूर्णपणे नष्ट झालेली असेल.हा सगळा काळाचा महिमा आहे.मानवाचे जीवन एक कालबद्ध कार्यक्रम आहे.हा ठरलेला कार्यक्रम शेवटपर्यंत चालू राहतो की मध्येच कोणते विघ्न येऊन कार्यक्रम संपतो याची मुळीच शाश्वती नसते.गंमत अशी की प्रत्येक मनुष्याचा जीवन कालावधी वेगवेगळा असतो. कोणी शंभर वर्षे जगतो,कोणी ऐंशी वर्षे जगतो,कोणी वयाची पासष्टी गाठतो तर कोणी पन्नाशीच्या अगोदरच गचकतो. व्यक्तीला मरण येण्याचे मार्ग वेगवेगळे आहेत.कोणी अपघातात गतप्राण होतो, कोणी हृदयविकाराने क्षणार्धात मृत्यू पावतो,कोणी कँसरने मरतो,कोणी रोगाने खंगून खंगून मरतो तर कोणी आत्महत्या करून जगाचा कायमचा निरोप घेतो.जन्म आहे म्हटल्यावर मृत्यू तर असणारच हा जगाचा नियम आहे. मृत्यूची जाणीव ठेवून किती लोक चांगले कर्म करतात?कष्टाची भाकरी खातात,सुखाची झोप झोपतात आणि आनंदाने जीवन जगतात.इथे अमरत्व मिळाल्यासारखे प्रत्येकजण तोऱ्यात जीवन जगत आहे.आपण इतरांपेक्षा वेगळे आहोत हे दाखवून देण्यासाठी सगळी मरमर सुरू आहे.

आपण लहानाचे मोठे होताना,चांगले व वाईट कर्म करताना आपल्या वर्तनाचे, व्यवहाराचे व जीवन जगण्याच्या पद्धतीचे हे जग अचूक मूल्यमापन करते आणि आपली एक ठराविक ओळख तयार होते.आपल्यापैकी कोणी स्वार्थी असतो,कोणी उधळ्या असतो,कोणी कंजूस असतो तर कोणी ऐतखाऊ असतो.कष्टाळू,निस्वार्थी,प्रामाणिक,नेक, परोपकारी,मदतगार,कर्तृत्ववान,सुहृदयी, चारित्र्यवान,हसतमुख अशी ओळख ही चांगल्या व्यक्तींची असते.वाईट लोकांची ओळख चांगल्या लोकांपेक्षा थोडी वेगळी असते.भ्रष्टाचारी,अप्रामाणिक, स्वार्थी,कामचुकार,आळशी,कुविचारी,

पाषाण हृदयी,निर्दयी,हरामी अशी ओळख ही वाईट लोकांची असते. आपली ओळख आपल्या चांगल्या व वाईट कर्माचे फलित असते.ओळखीचे हे लेबल एकदा चिकटले की ते निघता निघत नाही.श्रीमंतीचा,सौंदर्याचा,पैशाचा

,पदाचा आणि संपत्तीचा गर्व झाला की माणूस नात्यांना महत्त्व देत नाही.त्यांना नातेवाईक बिनकामाचे वाटतात.ज्यांना गर्व होत नाही,अहंकार जडत नाही,यश पदरात पडले तरीही ज्यांचे पाय नेहमी जमिनीवर असतत ते लोक जीवनात नातलगांना कधीच अंतर देत नाहीत.

व्यक्तींच्या आणखी काही वेगवेगळ्या ओळखी असतात.या ओळखी त्यांना विशिष्ट लेबल लावून जातात.कोणी दारुड्या तर कोणी खादाड असतो, कोणी लबाड,धूर्त,कपटी,चाणाक्ष असतो.आणि काहीजण विचित्र स्वभावाचे असतात. त्यांच्या मनाचा कधीच अंत लागत नाही.काही माणसं उथळ अंतःकरणाचे असतात,काही माणसं खोल मनाचे असतात आणि काही माणसं फार विचित्र असतात, आपल्या आकलनशक्तीच्या बाहेरचे असतात.आपल्या हयातीत आपली अशी वेगळी ओळख निर्माण झालेली असते.ही ओळख आपल्या पश्चात म्हणजे आपल्या मृत्यूनंतर किती काळ टिकून राहील हे कोणी सांगू शकत नाही.

निरभ्र आकाशाकडे स्वच्छ मनाने थोडावेळ एकटक पाहिले असता असे लक्षात येते की मानवी जीवन क्षणभंगुर आहे.निरपेक्ष मनाने विचार केला असता मनुष्य जीवनाला काहीच अर्थ नाही हे लक्षात येते.कारण एवढ्या मोठ्या विश्वात,महाकाय ब्रम्हांडात आपले अस्तित्व म्हणजे सुईच्या टोकावर असणारा अणू रेणू. आपण आपली इमेज सांभाळण्यासाठी,आपल्या चारित्र्याला डाग लागणार नाही या काळजीपोटी नेहमीच चांगले वागतो, चांगले बोलतो आणि चांगले कर्म करतो. लोक काय म्हणतील?समाज काय म्हणेल?गाववाले नावे ठेवतील?याच्या भितीपोटी बहुतांश लोक नेहमीच सत्कार्य करतात,परोपकार वृत्ती जोपासतात आणि दुसऱ्यांच्या मदतीला धावून जातात.खरेतर मनुष्य जीवनाला काहीच अर्थ नाही असे कळताच आपण तात्काळ सगळे वाईट कर्म त्यागले पाहिजे.पण तसे कधीच घडत नाही. भ्रष्टाचार करणारे भ्रष्टाचार करणे कधीच बंद करत नाहीत.वासनांच्या मोहात अडकणे सोडून देत नाहीत.दुसऱ्यांना फसवणे बंद करत नाहीत.काही लोक गैरमार्गाने अमाप संपत्ती कमावतात. मोठा बंगला बांधतात,गाड्या खरेदी करतात.त्यांची ती संपत्ती वारसा हक्काने त्यांच्या पुढील पिढीला मिळत असते.पण तुम्ही एवढी अमाप संपत्ती

कमावलेली असली तरीही तुमचा नातू किंवा पणतू याची आठवण ठेवेल,तुमची ओळख ठेवेल.पण त्यापुढील पिढीला तुमच्याशी काही घेणेदेणे नसते.अमाप संपत्ती कमावली म्हणून तुमची ओळख कोणी कायमस्वरूपी ठेवणार नाही. आज पासून बरोबर शंभर वर्षांच्या कालावधी नंतर तुमची कोणी आठवण काढणार नाही,तुमची ओळख पूर्णपणे पुसली गेली असेल.म्हणून मिळालेले मानवी जीवन आनंदाने जगा,हसत खेळत राहा,सर्वांबरोबर मिळून मिसळून राहा.आपल्या मिळकतीचा एक हिस्सा गोरगरीबांना दान देत चला.चांगले कर्म करत राहणे हीच खरी ओळख,हेच खरे जीवन आणि हाच खरा आनंद!

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### बाळ गोपाळांनी फोडली दहीहंडी; पेण तालुक्यात ग्रामीण भागात जल्लोष




**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०५, पेण (रायगड) :** श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने पेण तालुक्यातील ग्रामीण भागात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. गावागावांत बाल गोपाळ तसेच गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडत श्रीकृष्ण जन्माष्टमीचा आनंद द्विगुणित केला. दहीहंडीच्या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत गोविंदांचा उत्साह वाढवला. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा जावळी येथे राधाकृष्ण वेशभूषेत बालके सहभागी होत श्रीकृष्ण जन्माष्टमी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ग्रामीण भागातील विविध गावांमध्ये सकाळपासूनच दहीहंडी उत्सवाची तयारी सुरू होती. दहीहंडी बांधण्यात आल्यानंतर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या बाल गोपाळांनी 'गोविंदा आला रे आला'च्या जयघोषात मानवी मनोरे रचण्यास सुरुवात केली. एकापाठोपाठ एक थर रचत गोविंदा पथकांनी दहीहंडी फोडण्याचा प्रयत्न केला. उपस्थित नागरिकांचा जल्लोष यामुळे संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

दहीहंडी फोडताना बाल गोपाळांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि नागरिकांचा उत्साह हे यंदाच्या उत्सवाचे विशेष आकर्षण ठरले.पेण तालुक्यातील ग्रामीण भागात दहीहंडी हा केवळ धार्मिक उत्सव न राहता सामाजिक एकोप्याचे प्रतीक बनला आहे. विविध समाजातील नागरिक, महिला, युवक आणि बालकांनी उत्सवात सहभाग घेतला. त्यामुळे गावागावांत आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.दहीहंडीच्या निमित्ताने नागरिकांनी कुटुंबासह कार्यक्रमाला उपस्थित राहत उत्सवाचा आनंद घेतला. पारंपरिक सण-उत्सवांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सामाजिक व सांस्कृतिक परंपरा जपण्याचे काम होत असल्याचे यावेळी दिसून आले.

यंदाच्या दहीहंडी उत्सवात विशेषतः लहान मुलांचा उत्साह पाहण्यासारखा होता. जावळी जिल्हा परिषदेच्या शाळेत कृष्णाच्या वेशभूषेत सहभागी झालेली बालके आणि दहीहंडी फोडण्यासाठी तयार झालेली बाल गोविंदा पथके उपस्थितांचे आकर्षण ठरले.

### गुडसूरमध्ये श्रीं बालाजीचा वार्षिक उत्सव उत्साहात



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.०५, उदगीर (लातुर) :** उदगीर गुडसूर येथे श्रीं बालाजीचा वार्षिक उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. उत्सवानिमित्त मंदिर परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. सकाळपासूनच भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

विधिवत पूजा, अभिषेक, आरती तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्रींचे दर्शन घेतले. दिवसभर मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यावेळी गावातील नागरिक, भाविक, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, मंदिर समिती व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. उत्सवाच्या निमित्ताने भाविकांसाठी प्रसादाचे ही आयोजन करण्यात आले होते. शिस्तबद्ध नियोजनामुळे वार्षिक उत्सव उत्साहात आणि शांततेत पार पडला.

### खारघरच्या सायन-पनवेल महामार्गावरील दिशादर्शक फलकांची दुरवस्था




**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०५, खारघर (नवी मुंबई) :** खारघर येथील सायन-पनवेल महामार्गावर पनवेल, लोणावळा, पुणे व गोवा या ठिकाणांचे दिशादर्शन करणारा मोठा फलक सध्या जीर्ण व खराब अवस्थेत आहे. फलकाची अवस्था पाहता त्यावरील अक्षरे व दिशादर्शक माहिती स्पष्टपणे दिसत नसल्याने वाहनचालकांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, या महामार्गावर केवळ एकाच फलकाची नव्हे, तर अनेक दिशादर्शक व मार्गदर्शक फलकांची दुरवस्था झालेली असल्याचे दिसून येत आहे. काही फलकांवरील अक्षरे अस्पष्ट झाली आहेत, तर काही फलक जीर्ण झाल्याने त्यांची माहिती वाहनचालकांना व्यवस्थित वाचता येत नाही. त्यामुळे महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना योग्य दिशेचा अंदाज घेण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. सायन-पनवेल महामार्गावर दिवस-रात्र मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे वाहनचालकांना योग्य दिशेची माहिती देण्यासाठी दिशादर्शक फलक स्पष्ट आणि सुस्थितीत असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, अनेक फलकांची झालेली दुरवस्था पाहता संबंधित विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

फलक खराब झाल्यानंतर त्यांची वेळेत दुरुस्ती किंवा नवीन फलक बसविणे आवश्यक असताना, अद्याप त्यावर ठोस कार्यवाही झालेली दिसत नाही. त्यामुळे संबंधित महामार्ग विभागाने संपूर्ण सायन-पनवेल महामार्गावरील दिशादर्शक फलकांची पाहणी करून जीर्ण झालेले फलक तातडीने दुरुस्त करावेत किंवा आवश्यकतेनुसार नवीन फलक बसवावेत, अशी मागणी नागरिक व वाहनचालकांकडून होत आहे.

महामार्गावरील दिशादर्शक फलक केवळ मार्गदर्शनासाठी नसून वाहनचालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही महत्त्वाचे असतात. त्यामुळे संबंधित प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन संपूर्ण महामार्गावरील जीर्ण फलकांचा आढावा घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# दिव्यातील फेरीवाल्यांकडून महिन्याला ७५ लाख वसुलीचा आरोप


## UBT नेत्या अयोध्या पोळ यांचा शिंदे गटावर हल्लाबोल, आदेश भगत यांच्या प्रतिक्रियेकडे लक्ष

**अक्षराज ; विनोद वास्कर**

**दि.०५, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील राजकीय वातावरण सध्या चांगलेच तापले आहे. सोशल मीडियावर एक व्हिडिओ जोरदार व्हायरल होत असून त्यात UBT शिवसेनेच्या नेत्या अयोध्या पोळ यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यावर थेट निशाणा साधला आहे. या व्हिडिओमध्ये अयोध्या पोळ यांनी दिव्याचे नगरसेवक ॲड. आदेश भगत यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार आणि व्हायरल होत असलेल्या दाव्यानुसार –





श्रीकांत शिंदे यांचे खास समजले जाणारे आदेश भगत दिव्यातील सुमारे २५०० फेरीवाल्यांकडून दररोज प्रत्येकी १०० रुपये घेतात. हिशोब केल्यास दिवसाला अडीच लाख आणि महिन्याला ७५ लाख रुपयांची वसुली फेरीवाल्यांकडून केली जाते, असा आरोप करण्यात आला आहे. तसेच आमदार, खासदार, नगरसेवक, पदाधिकारी विकत घेण्यासाठी गोरगरिबांना लुटता का? असा सवालही उपस्थित करण्यात आला आहे. दरम्यान, अयोध्या पोळ यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना प्रेमळ सल्ला देताना आपल्या आजूबाजूला नेमके कोण आहेत, याचा विचार करा, असा सूचक इशाराही दिला आहे.

या प्रकरणामुळे शिंदे गटाकडून काय प्रतिक्रिया येते याकडे सर्व राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. विशेषतः या सर्व आरोपांवर दिव्याचे नगरसेवक ॲड. आदेश भगत काय स्पष्टीकरण देतात, हे आरोप खरे आहेत की खोटे हे त्यांच्या प्रतिक्रियेनंतरच स्पष्ट होईल.

# धरण भरले तरी जुईपाड्यात पाण्याची वणवण; महिलांचा हंडा मोर्चाचा इशारा

**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.०५, जुईनगर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिकेअंतर्गत सेक्टर २३, जुईपाडा गाव परिसरातील काही इमारतींना पालिकेचे धरण भरलेले असतानाही पिण्यासाठी पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार येथील गृहिणींनी केली आहे. मध्यंतरी जुईपाडा गावाला बुधवार आणि रविवार अशा दोन दिवशी एक वेळ पाणी सोडण्यात येत असल्याने गावातील नागरिकांना पाण्याअभावी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले होते. आता पाणीपुरवठ्याचे नियमितीकरण झाले असले तरी गावदेवी मंदिराच्या आजूबाजूला असलेल्या ठकाई निवास, दत्तात्रय निवास, साई माऊली निवास, हिराकुंज निवास आणि काशिनाथ निवास या इमारतींमधील रहिवाशांना अद्याप पुरेसा पाणीपुरवठा होत नसल्याची तक्रार आहे.

गावातील अनेक इमारतींना अधिकृत नळ कनेक्शन नसल्यामुळे पाणीपुरवठ्याच्या अडचणी निर्माण झाल्यास त्याकडे पालिका प्रशासन पुरेसे लक्ष देत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. नागरिकांचा दोष नसून, इमारती उभ्या राहिल्यानंतर पाणी वापर सुरू झाल्यावर पालिकेने अधिकृत नळजोडणी व पाण्याचे मीटर उपलब्ध करून देणे गरजेचे आहे, अशी मागणी रहिवाशांनी केली आहे.

लोकांनी मागणी केल्यानंतर मीटर देण्यापेक्षा इमारत तयार होऊन पाणी वापर सुरू झाल्यानंतर पालिकेने स्वतःहून पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. या व्यवस्थेअभावी पाण्याचा गैरवापर होण्यासोबतच नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याचे रहिवाशांचे म्हणणे आहे.

जुईपाडा गावातील गावदेवी मंदिर परिसरातील या इमारतींमधील रहिवासी गेल्या कित्येक महिन्यांपासून पुरेशा पाण्याअभावी त्रस्त असल्याचे महिलांनी सांगितले.

दरम्यान, मतदानाच्या वेळी सर्व पक्षांचे नगरसेवक दारोदारी फिरत होते. आता जुईनगरमध्ये चार-चार नगरसेवक असतानाही आमचा पाणी प्रश्न कोण सोडवणार? असा सवाल महिलांकडून उपस्थित केला जात आहे. आजच्या घडीला आमचा नगरसेवक कोण, हेच माहीत नसल्याची खंतही काही नागरिकांनी व्यक्त केली.

जुईपाडा गाव हे बी विभागात मोडत असून, येथील नगरसेविका शशिकला औटी असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, त्या परिसरात नियमितपणे दिसत नसल्याची नाराजी रहिवाशांनी व्यक्त केली आहे. इतर नगरसेवक व त्यांचे कार्यकर्ते मात्र दुसऱ्यांच्या प्रभागातील कामांमध्ये हस्तक्षेप करत असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे.

प्रशासनाने प्रत्येक नगरसेवकाला त्यांचा निश्चित वॉर्ड स्पष्टपणे नेमून द्यावा आणि नगरसेवकांनी विनाकारण दुसऱ्यांच्या प्रभागात हस्तक्षेप करू नये, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे. येत्या आठ दिवसांत आमचा पाणी प्रश्न सोडवला नाही, तर पाणीपुरवठा विभागाचे उपायुक्त व महापौर यांच्याकडे हंडा मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा जुईपाडा गावातील महिलांनी दिला आहे.

# शिक्षक दिनानिमित्त के.रामलू शाळेत स्वयंशासन दिन उत्साहात

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०५, कुंडलवाडी (नांदेड) :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून के. रामलू पब्लिक स्कूल, कुंडलवाडी येथे स्वयंशासन दिन अत्यंत उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांनी एक दिवसासाठी शिक्षक व प्रशासकाची भूमिका स्वीकारत वर्ग अध्यापनाचे कार्य अत्यंत उत्स्फूर्तपणे आणि जबाबदारीने पार पाडले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थितांच्या हस्ते भारताचे माजी राष्ट्रपती व महान शिक्षणतज्ज्ञ डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका साकारताना अध्यापनाचे नियोजन,वर्गशिस्त,विद्यार्थ्यांशी संवाद तसेच विषय समजावून सांगण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला.

या अनोख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षकांच्या कार्याची जाणीव झाली आणि अध्यापनातील जबाबदारीचे महत्त्व समजले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्करवार होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून मिलिंद विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक एन.जी. देवकरे उपस्थित होते.

विशेष म्हणजे देवकरे सर हे संस्थापक अध्यक्ष सायरेड्डी ठक्करवार यांचे शालेय जीवनातील गुरु राहिले आहेत. तसेच मंचावर संस्थेच्या संचालिका रमा ठक्करवार, प्रिन्सिपल संभाजी जाधव, व्हाईस प्रिन्सिपल सपना म्हैसेवाड, पर्यवेक्षक संतोष भाले, एकदिवसीय संचालिका पूर्वजा कुलकर्णी, प्रिन्सिपल वंशी कृष्णा धात्रक व व्हाईस प्रिन्सिपल शिवलीला हिवराळे उपस्थित होते.एकदिवसीय शिक्षक म्हणून कार्य केलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून अध्यापन करताना आलेले अनुभव,अडचणी आणि वर्ग व्यवस्थापनाचे विचार मांडले. प्रमुख पाहुणे एन.जी.देवकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले, ज्ञानाइतके पवित्र कार्य जगतात दुसरे नाही. विद्यार्थी ही कोरी पाटी असते आणि



शिक्षक त्यावर संस्काराचे धडे गिरवत असतात. प्रत्येक विद्यार्थ्याने लहान वयातच आपल्या जीवनाचे ध्येय निश्चित केले पाहिजे. कमी बुद्ध्यांक असणाऱ्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता आत्मविश्वासाने आणि जिद्दीने अभ्यास केल्यास यश निश्चित मिळते.के. रामलू पब्लिक स्कूल ही या परिसरात शैक्षणिक गुणवत्तेसोबतच धार्मिक, सामाजिक,अध्यात्मिक व सांस्कृतिक उपक्रम नेहमीच अत्यंत उत्कृष्टपणे राबवत असल्याचे चित्र दिसून येते.या प्रसंगी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेतील सर्व शिक्षकांना लेखणी (पेन) भेट देऊन शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच संस्थेचे अध्यक्ष सायरेड्डी ठक्करवार, सचिव यशवंत संगमवार, संचालिका रमा ठक्करवार, प्रिन्सिपल संभाजी जाधव व व्हाईस प्रिन्सिपल सपना म्हैसेवाड यांनी सर्व शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.हा उपक्रम व संपूर्ण कार्यक्रम अत्यंत स्तुत्य ठरला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षिकेचे बहुमोल सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सहशिक्षक दत्ता हमंद यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षक संतोष भाले यांनी मानले.

# ५.७५३ किलो गांजासह २ लाख ८७ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त: दोघे ताब्यात

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** बल्लारपूर – बामणी मार्गावर गांजाची अवैध वाहतूक करणाऱ्या दोघांना चंद्रपूर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेत त्यांच्याकडून तब्बल ५.७५३ किलो गांजा जप्त केला. ही कारवाई ५ सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास बल्लारपूर येथील होंडा शोरूमजवळ, जिओ सेंटरसमोर करण्यात आली. जप्त गांजाची अंदाजे किंमत २ लाख ८७ हजार ६५० रुपये आहे. या कारवाईत मंगेश संतोष उंदीरवाडे २३ वर्षे रा.सोनापूर, ता.चामोर्शी, जि.गडचिरोली आणि सागर बाबुराव मरगडे १९ वर्षे रा. निमगाव, ता. पवनी, जि. भंडारा यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा नोंदविला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चंद्रपूर शहरात गस्तीवर असताना गोपनीय माहितीदाराकडून दोघे गांजाची अवैध वाहतूक करून बल्लारपूरहून बामणीमार्गे चामोर्शीकडे जाणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने बल्लारपूर-बामणी मार्गावर सापळा रचला. पहाटे सुमारे १.३५ वाजता माहितीदाराने दिलेल्या वर्णनाप्रमाणे दोन इसम पाठीवर लाल-काळ्या रंगाच्या बॅगा घेऊन येताना दिसले. पोलिसांनी त्यांना थांबवून चौकशी केली असता त्यांनी मंगेश उंदीरवाडे व सागर मरगडे अशी नावे सांगितली.आरोपीचे झडती घेतली असता सागर मरगडे याच्या बॅगेत कपड्यां व्यतिरिक्त आक्षेपार्ह वस्तू आढळली नाही. त्याच्याकडून एक जुना विवो कंपनीचा मोबाईल जप्त करण्यात आला. दरम्यान, मंगेश उंदीरवाडे याच्या बॅगेची झडती घेतली असता ब्राउन रंगाच्या पॅकिंग टेपने गुंडाळलेली दोन पार्सले आढळून आली. पार्सले उघडून पाहिल्यावर त्यामध्ये हिरवट रंगाची, उग्र वासाची गांजा सदृश्य वनस्पती आढळली. प्राथमिक



तपासणीतही सदर पदार्थ गांजासदृश्य असल्याचे निष्पन्न झाले. वजन केल्यानंतर पहिल्या पार्सलमधून ३.४५८ किलो, दुसऱ्या पार्सलमधून २.२६८ किलो, तर बॅगेतील छोट्या कप्प्यातून ०.०२७ किलो, असा एकूण ५.७५३ किलो गांजा जप्त करण्यात आला. यासोबतच मंगेशकडून सुमारे २० हजार रुपये किमतीचा रिअलमी कंपनीचा मोबाईल आणि ३ हजार ८०० रुपये रोख जप्त करण्यात आले. असे एकूण ३ लाख ३१ हजार ९५० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचा नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक योगेश हिवसे, पोलीस उपनिरीक्षक विनोद भुरले, पोहवा सतीश अवथरे, इम्रान खान, लालू यादव, हिरालाल गुप्ता, संदीप कांबळी, किशोर वैरागडे, पोअं किशोर वाकाटे, शशांक बदामवार, चापोअं मिलिंद टेकाम सह सायबर सेल चे पोहवा कार्तिक खनके यांनी केले.

# मांडवे खुर्द शाळेला ‘आदर्श’ आणि ‘सुंदर शाळा’ पुरस्कारात तालुक्यात प्रथम



संस्कृत, जर्मन आणि मोडी लिपीचे अनोखे शिक्षण
केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर शाळेचा भर आहे.

१. संस्कृत, जर्मन आणि मोडी लिपीचे विशेष वर्ग
२. इंग्रजी आत्मविश्वास वाढीसाठी संभाषण आणि नाट्य उपक्रम
३. कुसुमाग्रज वाचन मोहीम, इको-क्लब आणि किचन गार्डन उपक्रम
४. शिष्यवृत्ती आणि स्पर्धा परीक्षांसाठी तंत्रस्नेही सराव व मार्गदर्शन
५. तालुका व जिल्हास्तरीय क्रीडा आणि गुणदर्शन स्पर्धेत दरवर्षी पदके

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** समर्पित शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, पालक आणि शिक्षणप्रेमी ग्रामस्थ यांच्या एकजुटीतून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मांडवे खुर्द (ता. पारनेर) ने केवळ ३ वर्षांत कायापालट घडवला आहे. या गुणवत्तेच्या जोरावर शाळेने दोन मानाचे पुरस्कार पटकावले आहेत. जिल्हा परिषद अहिल्यानगर आयोजित ‘आदर्श शाळा स्पर्धा’ आणि राज्यस्तरीय ‘मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ या दोन्ही स्पर्धांमध्ये शाळेने पारनेर तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत दुहेरी ऐतिहासिक यश संपादन केले. शिक्षक दिनाचे औचित्य साधून जिल्हा परिषदेच्या भव्य पुरस्कार सोहळ्यात शाळेला ’माझी आदर्श शाळा’ म्हणून मानपत्र आणि गौरवचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. शाळेच्या या यशात पटसंख्या वाढ हे ठळक वैशिष्ट्य आहे. योग्य नियोजन आणि संस्कारक्षम शिक्षणामुळे पालकांचा विश्वास वाढला असून, इंग्रजी शाळांकडे गेलेले विद्यार्थी पुन्हा जिल्हा परिषद शाळेकडे वळले आहेत. गेल्या तीन वर्षांत शाळेची पटसंख्या ९२ वरून १८० वर पोहोचली आहे.

या पुरस्कार सोहळ्यास जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, सर्व तालुक्यांचे आमदार, गटशिक्षणाधिकारी, विस्ताराधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि ग्रामस्थ उपस्थित होते. शिक्षकांचे मार्गदर्शन, ग्रामपंचायतीचे पाठबळ, शाळा व्यवस्थापन समितीची सक्रियता आणि पालकांचे सहकार्य या पंचसूत्रीमुळेच मांडवे खुर्द एक मॉडेल शाळा म्हणून उदयास आली आहे.

# जरांगे यांच्या समर्थनार्थ सकल मराठा समाजाच्या वतीने मुक्रमाबाद येथे रास्ता रोको

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.०५, मुखेड (नांदेड) :** मराठा समाजाला तत्काळ आरक्षण मिळावे आणि सरसकट कुणबी जातीचे प्रमाणपत्र वितरित करण्यात यावे, या प्रमुख मागण्यांसाठी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाचा आज आठवा दिवस आहे.

या उपोषणाला खंबीर पाठिंबा दर्शवण्यासाठी आणि सरकारच्या उदासीन धोरणाचा निषेध नोंदवण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने पुकारण्यात आलेल्या मुक्रमाबाद येथे रेणापुर - निझामाबाद राष्ट्रीय महामार्गावर’ रास्ता रोको आंदोलन करण्यात आला. महामार्ग बंद असल्याने वाहतूकीची कांही प्रमाणात कोंडी झाली होती. मुक्रमाबाद शहरातील मुख्य बसस्थानक चौकात केलेल्या रास्ता रोकोला मराठा बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सरकारकडून आरक्षणाबाबत कोणताही सकारात्मक निर्णय होत नसल्याने मराठा समाजात तीव्र संतापाची



लाट पसरली आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित रास्ता रोको च्या अहवानाला प्रतिसाद देत सकाळी ९ वाजता सकल मराठा समाजाचे शेकडो कार्यकर्ते शहरातील व परिसरातील रस्त्यावर चौकात एकत्र आले. सर्वप्रथम शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि घोषणाबाजी करत आंदोलनाला सुरुवात झाली. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून मोठ्या संख्येने सकल मराठा बांधव उपस्थित होते.

रास्ता रोको च्या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण होऊ नये आणि शांतता टिकून राहावी यासाठी प्रशासनाच्या वतीने कडक पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. उपविभागीय पोलीस अधिकारी देगलूर यांच्या मार्गदर्शनाखाली मुक्रमाबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू चव्हाण व पोलीस उप निरीक्षक मोरे यांनी शहरात पोलीस पथके तैनात केली होती. बीट जमादार भुताळे, ढगे, व महिला पोलीस मोठ्या संखेने तैनात होत्या. सकल मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी अतिशय शांततेच्या मार्गाने आंदोलन पार पाडत आपला रोष व्यक्त केला.

# गणेशोत्सवाच्या गर्दीत ‘जादा भाडे’खोरांना लगाम; पनवेल आरटीओची धडक मोहीम

## चाकरमान्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी विशेष तपासणी; रिक्षा-बसमधील नियमभंगावर कठोर कारवाईचा इशारा

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.०४, रायगड :** गणेशोत्सवासाठी मुंबईसह राज्याच्या विविध भागांतून कोकणाकडे रवाना होणाऱ्या लाखो चाकरमान्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) कंबर कसली आहे. सणासुदीच्या गर्दीचा गैरफायदा घेत प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारणे, क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक करणे, प्रवाशांशी गैरवर्तन करणे तसेच वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा आणि बसचालक-मालकांवर कठोर कारवाई करण्याचा इशारा आरटीओकडून देण्यात आला आहे.

गणेशोत्सवाच्या काळात रेल्वे स्थानके, बसस्थानके आणि प्रमुख वाहतूक केंद्रांवर प्रवाशांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आरटीओकडून वाहनांची तपासणी आणि नियमपालनावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. रिक्षाचालकांनी वाहनांची सर्व आवश्यक कागदपत्रे वैध ठेवावीत तसेच रेल्वे स्थानक आणि प्रमुख थांब्यांवर वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, अशा पद्धतीने वाहने उभी करावीत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.जादा भाडे आकारणाऱ्यांवर कारवाईप्रवाशांकडून शासन अथवा परिवहन विभागाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक भाडे आकारल्याचे आढळल्यास संबंधित वाहनचालकावर कारवाई करण्यात येणार आहे. त्याचबरोबर प्रवाशांशी उद्धटपणे वर्तन करणे किंवा रिक्षाच्या निर्धारित क्षमतेपेक्षा अधिक प्रवाशांची वाहतूक करणे ही महागात पडणार आहे. गणेशोत्सवातील वाढत्या प्रवासी संख्येचा गैरफायदा घेत खासगी आणि प्रवासी बसमधून अवाजवी भाडे आकारले जात नाही ना, याचीही तपासणी करण्यात येणार आहे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी बसच्या फेऱ्या आणि सुटण्याच्या वेळांचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना वाहतूकदारांना देण्यात आल्या आहेत. बसच्या सुरक्षेची ही तपासणीखासगी तसेच प्रवासी बसमधील आपत्कालीन खिडकी व दरवाजा, अग्निशामक यंत्रणा आणि प्रथमोपचार पेटी सुस्थितीत असणे आवश्यक आहे. चालक मद्यपान करून किंवा धोकादायक पद्धतीने वाहन चालवित असल्याचे आढळल्यास चालकासह संबंधित बस मालकावर ही मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई केली जाणार आहे.

प्रवाशांनी तक्रारीसाठी पुढे यावेप्रवासादरम्यान




जादा भाडे आकारले जात असल्यास, प्रवाशांशी गैरवर्तन होत असल्यास किंवा वाहतूक नियमांचे उल्लंघन आढळल्यास नागरिकांनी संबंधित वाहनाचा क्रमांक, प्रवासाचा मार्ग आणि तक्रारीचा तपशील नमूद करून पनवेल आरटीओकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारीसाठी Rto.46-mhgov.in या अधिकृत ई-मेलवर संपर्क साधता येणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात वाहतूकदारांनी नियमांचे काटेकोर पालन करावे आणि चाकरमान्यांचा प्रवास सुरक्षित व सुरळीत करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पनवेल आरटीओकडून करण्यात आले आहे.

# पालम तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या

**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.०५,पालम (परभणी) :** पालम तालुक्यात यंदा जून महिन्यापासूनच पावसाचे प्रमाण अत्यल्प असून, अल्प पावसामुळे शेती संकटात सापडली आहे. त्यामुळे शासनाने पालम तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करून शेतकरी व शेतमजुरांना तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी,अशी मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीच्या वतीने पालम तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, यावर्षी जेमतेम पावसावर शेतकऱ्यांना दुबार, तिबार पेरणी करावी लागली. पेरणीनंतरही पिकांना आवश्यक तेवढा पाऊस झालेला नाही. अल्पशा पावसावर आतापर्यंत कशीबशी वाचविलेली पिके आता पाण्याअभावी वाळू लागली आहेत.

शेतकऱ्यांनी काबाडकष्ट करून आणि मोठ्या प्रमाणात खर्च करून जोपासलेली पिके डोळ्यादेखत वाळत असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतीमध्ये कधी दुष्काळ तर कधी उत्पादनाला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी आस्मानी आणि सुलतानी अशा दुहेरी संकटात सापडला आहे. वाढता उत्पादन खर्च, अपुरे उत्पन्न आणि कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांसमोर गंभीर आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

शासनाने या परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देऊन शेतकरी व



शेतमजुरांना तातडीने आर्थिक मदत करावी, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

शासनाने मागणीची तातडीने दखल न घेतल्यास भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटी, पालमच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

या निवेदनावर काँग्रेसचे तालुकाध्यक्ष माधवराव फाजगे यांच्या सह जेष्ठ नेते अकबर खां पठाण, शहराध्यक्ष साबेर कुरेशी, गोपीनाथराव देशमुख, उत्तमराव गादगे, विनायकराव नखाते, अबरार काझी, सय्यद मन्सूर, शिवाजीराव भस्के, पंडितराव धुळगुंडे, शरद येमये आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# थोडक्यात बातम्या

## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा ४९ वा वर्धापन दिन उत्साहात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, खापरखेडा (नागपूर) :** औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा येथे विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा ४९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाचे औचित्य साधून संघटनेचे पदाधिकारी आणि सभासद यांच्या उपस्थितीत वीज केंद्राच्या गेट क्रमांक २ समोर संघटनेच्या वार्ता फलकाचे अनावर संघटनेचे माजी केंद्रीय उपाध्यक्ष शैलेंद्र अर्जितवार यांच्या हस्ते करण्यात आले. संघटनेचे झोन अध्यक्ष संजयकुमार गर्जे यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी झोन सचिव नंदकिशोर पाहूणे, माजी झोन उपाध्यक्ष नरेश पुप्पलवार, शाखा सचिव रूपाली बोंबाटे, माजी केंद्रीय उपाध्यक्ष शैलेंद्र अर्जीतवार, झोन अध्यक्ष संजीवकुमार गर्जे यांनी उपस्थित पदाधिकारी व सभासदांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगद शितळे यांनी तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विलास हिंगे यांनी केले. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा ४९ वा वर्धापन दिन उत्साहात



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०५, नागपूर :** औष्णिक विद्युत केंद्र खापरखेडा येथे विद्युत क्षेत्र तांत्रिक कामगार युनियनचा ४९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वर्धापन दिनाचे औचित्य साधून संघटनेचे पदाधिकारी आणि सभासद यांच्या उपस्थितीत वीज केंद्राच्या गेट क्रमांक २ समोर संघटनेच्या वार्ता फलकाचे अनावर संघटनेचे माजी केंद्रीय उपाध्यक्ष शैलेंद्र अर्जितवार यांच्या हस्ते करण्यात आले. संघटनेचे झोन अध्यक्ष संजयकुमार गर्जे यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी झोन सचिव नंदकिशोर पाहूणे, माजी झोन उपाध्यक्ष नरेश पुप्पलवार, शाखा सचिव रूपाली बोंबाटे, माजी केंद्रीय उपाध्यक्ष शैलेंद्र अर्जीतवार, झोन अध्यक्ष संजीवकुमार गर्जे यांनी उपस्थित पदाधिकारी व सभासदांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगद शितळे यांनी तर प्रास्ताविक व आभार प्रदर्शन विलास हिंगे यांनी केले. वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एक दोन तीन चार शंकरराव चव्हाण शाळेतील पोरं हुशार...

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०४, नागपूर :** नंद के घर आनंद भयो जय कन्हैय्या लाल की, हाथी घोडा पालखी, जय कन्हैय्या लाल की च्या जल्लोषात श्रीकृष्ण जन्माष्टमीचे औचित्य साधून प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण इंग्लिश शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांचा दहीहंडीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिनांक ०४ सप्टेंबर शाळेच्या पटांगणावर दहीहंडी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरस्वती माता व श्रीकृष्णाच्या प्रतिमेला मल्यार्पन करून द्विप प्रज्वलित करण्यात आले. याप्रसंगी मराविम कर्मचारी शिक्षण संस्थेचे सचिव गणेश चिखले, उपाध्यक्ष सुनील जालंदर, सदस्या यामिनी घोरमाडे, मुख्याध्यापिका रजनी गजभिये यांच्यासह शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.दहीहंडी कार्यक्रमा दरम्यान शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्मावर आधारित सुंदर नाटिका सादर केली. शिवाय यावेळी विविध गीत व एका पेक्षा एक सरस नृत्य सादर केले. जवळपास १५ फुट अंतरावर दहीहंडी बांधण्यात आली. सुरक्षेच्या दृष्टीकोनातून पथक तयार करण्यात आले. दहीहंडी फोडण्यासाठी तीन रिंगण तयार करण्यात आले होते. दहीहंडी फोडतांना चिमुकल्या विद्यार्थ्यांनी गोपाल कृष्ण भगवान की जय, हरे कृष्ण गोविंद हरे मुरारी, हे नाथ नारायण वासुदेवा, राधे राधे, आदि जयघोष करीत परिसर दणाणून सोडला होता. कार्यक्रमाचे संचालन रुपाली लाकडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता वेदिका ढगे, प्रतिमा श्रीवास्तव, शुभम गायकवाड, सबिना मन्सूरी, शुभांगी ठाकरे, कविता गोमकाळे, दुर्गा मने यांच्यासह ऋतुल इंगळे, वैदयी आगलावे, हिमांशू शिंदूरकर, आरुष श्रीवास्तव, अंश ढोके, वेदांत खडतकर, रुद्र ठाकरे, आदींनी सहकार्य केले.

## जनजागृती सेवा संस्थेच्या आरती संग्रहाचे प्रकाशन



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.०५, माथेरान :** जनजागृती सेवा संस्थेतर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या आरती संग्रहाचे प्रकाशन दिनांक ०४ सप्टेंबर रोजी कणकवली येथे मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी बोलताना अभिनेते अभय खडपकर यांनी आरती संग्रहाचे कौतुक करत, अत्यंत दर्जेदार आणि वाचण्यासाठी सुलभ असा हा आरती संग्रह कोकणातील प्रत्येक घरापर्यंत पोहोचावा, अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन अभय खडपकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने, तर माजी जिल्हा परिषद सदस्या राजश्री धुमाळे यांच्या हस्ते गणेश प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर नगरसेविका मनस्वी ठाणेकर, अक्षरोत्सव प्रमुख तथा पत्रकार निकेत पावसकर, सेवानिवृत्त वाहतूक निरीक्षक प्रकाश साखरे, उद्योजक मिथुन ठाणेकर आणि जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते आरती संग्रहाचे प्रकाशन करण्यात आले. संग्रहाचे अवलोकन केल्यानंतर उपस्थितांनी त्याचे विशेष कौतुक केले. जनजागृती सेवा संस्थेच्या सातत्यपूर्ण सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे ही यावेळी गौरवोद्गार काढण्यात आले. कोकणासह महाराष्ट्रातील विविध भागांत संस्थेने उभारलेले कार्य प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमात गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प, संस्था अहवाल, आभारपत्र, आरती संग्रह आणि गणेश प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार गुरुनाथ तिरपणकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे खजिनदार दत्ता कडुलकर आणि गंधाली तिरपणकर यांचे विशेष सहकार्य लाभले.